दि. 29 NOV 2018

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# अधिसूचना

**महानिर्मिती जाहिरात क्र.०१(Jan)/२०१७ अन्वये सुरक्षा संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाद्वारे भरण्याकरीता देण्यात आलेल्या सरळसेवा जाहिरातीस अनुसरुन शारीरिक क्षमता चाचणी बाबत.**

**संदर्भ:- महानिर्मिती जाहिरात क्र.०१(Jan)/२०१७**

महानिर्मिती कंपनीतर्फे जाहिरात क्र. ०१(Jan)/२०१७ अन्वये सुरक्षा संवर्गातील कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)) या पदाची रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाद्वारे भरण्याकरीता सरळसेवेची जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदरील पदांसाठीची लेखी परीक्षा यापूर्वीच पार पाडण्यात आलेली आहे. सदरील पदाच्या शारीरिक क्षमता चाचणी परीक्षा घेण्याबाबतची कार्यवाही लवकरच पार पाडण्यात येणार आहे.

मा.सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या मंजूरीनुसार कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)) या पदाच्या पद भरतीत जाहिरात केलेल्या पदांच्या १५% म्हणजेच ०५ पदे महानिर्मिती कंपनीत कार्यरत पहारेकरी / सुरक्षा रक्षक कर्मचाऱ्यांसाठी आरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | प्रवर्ग | जाहिरात केलेली पदे | महानिर्मिती पहारेकरी सुरक्षा रक्षकांसाठी आरक्षित पदे | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | अनु.जमाती | ०४ | १ | |
| २ | इ.मा.व | ०५ | १ | |
| ३ | खुला | १६ | ३ | |
| | **एकुण** | **३१** | **५** | |

तसेच, महानिर्मिती कंपनीत कार्यरत पहारेकरी / सुरक्षा रक्षक यातील बहुतांशी कर्मचाऱ्यांचे वय ४५ वर्षाच्या आसपास व त्यापेक्षा अधिकचे असल्याने त्यांच्याकरीता शारीरीक क्षमता चाचणीचे (Physical efficiency test) निकष खालील प्रमाणे असतील.

| अ.क्र | शारीरीक क्षमता चाचणी (Physical Efficiency Test) निकष | पात्रतेचे निकष |
|---|---|---|
| १ | ८०० मीटर धावणे | ०४ मिनीटे ३० सेंकद किंवा त्यापेक्षा कमी |
| २ | ४० कि.ग्रॅ. वजन खांद्यावर घेवुन ६० मीटर चालणे | वेळेचे बंधन नाही. |
| ३ | ०९ फुट उंच रस्सीवर चढणे | वेळेचे बंधन नाही. |
| ४ | २० सीट-अप्स किंवा ०४ पुल-अप्स | वेळेचे बंधन नाही. |

तथापी, कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)) या पदाकरिता जाहिरातीत देण्यात आलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव, इतर सर्व अटी व शर्ती या अबाधीत राहतील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(विनोद बोंदरे)
**कार्यकारी संचालक (मासं)**
**महानिर्मिती**